**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-413001
आयुक्त यांचे कार्यालय

**जा.क्र.नआ/वै/** २०८ **दिनांक :-** ७३ /06/2022

## - <u>जाहीर आवाहन</u> -

सोलापूर शहरातील सर्व मिळकतदारांना कळविण्यात येते की, यापूर्वी मालमत्ता कर विभागाकडे मिळकतदारांना (स्पेशल) विशेष नोटीस बजावण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन मिळकतदारांनी हरकती घेतलेले आहेत. परंतु नोटीस मधील काही तांत्रिक चुकामुळे सदर नोटीसा स्थगीत करण्यात येत असून, यापुढे या नोटीसी बाबत मालमत्ता कर विभागाकडे हरकती देऊ नयेत याची सर्व मिळकतदारांनी नोंद घ्यावी.

**पि.शिवशंकर** (भा.प्र.से.)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

ligned by P.sivasankar
Date: 07-06-2022 13:18:15
Reason: Approved

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-413001
आयुक्त यांचे कार्यालय

**जा.क्र.नआ/वै/** 20८ **दिनांक :-** 13 /06/2022

## - जाहीर आवाहन -

सोलापूर महानगरपालिका, क्षेत्रातील मिळकतींची मालमत्ता कर आकारणी ही मालमत्तेचे क्षेत्रफळ व वापराचा प्रकार (निवासी / अनिवासी) यावर आधारभूत आहे. यानुसार मालमत्तेचे करयोग्य मूल्य निर्धारीत करुन, मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची बिले दिली जातात. सोलापूर महानगरपालिका, मालमत्ता कर विभागामार्फत जनरल रिव्हीजनचे कामकाज चालू आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम शेडयुल 'ड' प्रकरण 8 कराधान नियम 5(1) अन्वये मिळकतीचे बांधकाम झाल्यास, मिळकतीची पुनर्बाधणी झाल्यास, अथवा मिळकतीचा वापर सुरु झाल्यानंतर मालमत्ता कर आकारणी करणेकरिता मिळकतमालक/ मिळकतधारक यांनी महापालिकेस कागदपत्रासह कळविणे बंधनकारक आहे. तथापि, असे असताना जे मिळकतमालक/ धारक त्यांच्या मिळकतीची माहिती महापालिकेस सादर करीत नाहीत अशा मिळकतधारकाकडून मालमत्ता कर आकारणीसाठी कागदपत्रे / माहिती मागविण्याबाबत कराधान नियम 8(1) मध्ये तरतुद आहे. तसेच कराधान नियम 8(2) अन्वये माहिती देण्यास संबंधित मिळकतदारास बंधनकारक आहे.

यानुसार सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांना/ नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की, ज्या मालमत्ताधारकांनी त्यांच्या मालमत्तेच्या क्षेत्रफळात वाढ केली आहे. / विकसित केली आहे / मालमत्ता भाडेतत्वावर वापरण्याकरिता दिली आहे. तथापि अशा मालमत्तेच्या मालमत्ता कर आकारणीमध्ये सुधारणा / बदल करणेकरिता महापालिकेस कळविण्यात आले नाही. परिणामी संबंधित मालमत्तेच्या कर आकारणीमध्ये सुधारणा / बदल झालेला नाही. अशा मालमत्तामालक / धारकांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून, त्याच्या मालमत्तेची माहिती खालील नमुन्यात 7(सात) दिवसात भरुन, सदरील अर्ज मालमत्ता कर विभागात सादर करावा. अर्जाचा नमुना ऑनलाईन म.न.पा.च्या वेबसाईट (http://www.solapurcorporation.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्याचा पर्याय दिला आहे.

जे मालमत्ताधारक विहित मुदतीत महापालिकेस कर आकारणीकरिता माहिती / कागदपत्रे सादर करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेस महापालिका एकतर्फी कर आकारणी करेल आणि अशा कर आकारणीस आक्षेप नोंदविणेकरिता कराधान नियम 8(3) अन्वये मालमत्ताधारकास प्रतिबंध राहील व अशी कर आकारणी मालमत्ताधारक यांचेवर बंधनकारक राहील.

मालमत्ताधारकाकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास आणि तद्नंतर संबंधित मालमत्तेमध्ये वाढीव बांधकाम /बांधकामाच्या वापरात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित मालमत्तेवर ज्ञात माहितीच्या आधारे कर आकारणी केली जाईल याची नोंद घ्यावी.

**पि.शिवशंकर** (भा.प्र.से.)
आयुक्त,
सोलापर महानगरपालिका. सोलापर

ligned by P.sivasankar
Date: 07-06-2022 13:17:12
Reason: Approved